CS (MAIN) Exam:2016

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours	Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास	कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी तीन प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान एक तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहावयाचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतेली एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) आपणा सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी निर्माण केला आहे आणि त्यास आपआपसात सारखे हक्काचा उपभोग घेण्यास समर्थ केला आहे. आणि याच कारणास्तव प्रत्येक मनुष्य गावातील व मुलखातील अधिकारांच्या जागा चालविण्याचा अधिकारी आहे.

(b) एकु दिसु भटोबासांसि पंडितः केशोबासिं संस्कृतभाषां प्रश्न केलाः त्यावरि भटोबासीं म्हणितलेः 'पंडितां केशवदेयाः तुमचा 'अस्मात्-कस्मात्' मी नेणें गाः मज श्री चक्रधरें निरुपिलीं मऱ्हाटीः तियाचि पुसाः'.

(c) मला वाटायला लागले की महात्मा फुलेनी मानव जातीला न उचलण्या-येवढे उपकार करून ठेवलेत पण त्याच वंशाचा माळी माणूस इकडे अज्ञानाच्या गर्तेत गुरफटलेला आहे. म्हणजे कुठेही जा मग माणसात असो की निसर्गात तिथे तुमची जात येणारच. माळी, बामण व सगळे एका धरतीची लेकरे आज वर आहोत उद्या तिच्याखाली (उदरात) जाणार आहोत व तेथे कोण-कोठे याचा पत्ताही लागणार नाही. परंतु हे सगळे नखरे वर असेपर्यंतच.

(d) समाजाच्या कर्तृत्वविकासात दोन्ही तऱ्हेच्या कुटुंबपद्धति अवश्य आहेत. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्री व पुरुष यांची श्रमविभागणी होऊन स्त्रीस केवळ गृहकर्मेच करावी लागतात. जेव्हां स्त्रीस द्रव्यार्जनदेखील करावे लागते तेव्हा तीस कायद्याने जरी कौटुंबिक सत्ता दिली नसली तरी ती उत्पन्न होतेच. यासाठी स्त्रीसत्ता चोरट्या द्वाराने येऊ न देता उघड्या द्वाराने येऊ द्या. त्या सत्तेचे विचारपूर्वक संरक्षण संवर्धन पाहिजे.

(e) आता काळहि बदलला, कायदेहि बदलले, सगळयाच गोष्टी बदलल्या ! आणि आम्हीं देखील कालपरिस्थितीच्या मानाने आमची मतेंहि बदललीच ! न बदलून काय चालतं आहे?

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन महत्त्व सोदाहरण स्पष्ट करा. 15

(b) ''नाटककार अत्रे यांनी मराठी रंगभूमीला जीवनदान दिले, आपल्या विनोदी व गंभीर नाटकांनी ती जिवंत ठेवली.'' या विधानाचा परामर्श घ्या. 15

(c) 'बाबुराव बागुलांचे कथाविश्व त्यांच्या जीवनदृष्टीतून, त्यांच्या तत्त्वचिंतनातून व अनुभवलेल्या जगण्यातून साकार झाले आहे'. 'जेव्हां मी जात चोरली होती' च्या आधारे चर्चा करा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ग्रामीण स्त्रियांच्या संघर्षमय जीवनाचे यथार्थ चित्रण उद्धव शेळके यांनी 'शिळान' कथा संग्रहात कसे केले आहे, याचे सविस्तर विवेचन करा. 15

(b) 'जन हे वोळतु जेथे' कादंबरीचा मध्यवर्ती आशय उलगडून दाखवा. 15

(c) 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीत नैतिकदृष्ट्या स्खलनशील स्त्री-पुरुष संबंधांचा विचार केला आहे. साधार चर्चा करा. 20

Optional Province · optionalprovince.com

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांची मध्यवर्ती कल्पना स्त्री-पुरुष नातेसंबंधांभोवतीच फिरते.'' या विधानाची 'एकेक पान गळावया'च्या आधारे चिकित्सा करा. 15

(b) 'गतायुष्यात भोगलेली दुःखे, यातना, अस्पृष्यतेचे चटके आणि दारिद्र्याची भीषणता 'आठवर्णीचे पक्षी' या आत्मकथनात प्र.ई. सोनकांबळे यांनी मांडली आहे.' सविस्तर परामर्श घ्या. 15

(c) 'शेतकऱ्याचा असूड' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' मधील विचारांमुळे समाज परिवर्तन प्रक्रियेला वेगळे परिमाण कसे लाभले ते सविस्तर लिहा. 20

SECTION—B

5. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) या शहरावर, संस्कृतीवर, फुलांवर कसा उरावा विश्वास
भडाभडा चार तांबे ओतून मोकळे होऊ नये, तर काय करावे?
म्हणालोच, ही पृथ्वीः हिला केवळ जन्माला घालणेच ठाऊक आहे.
आपणच आपणाला सदैव सदा घालू नये, तर काय करावे?

(b) गजबज बहु जाली माय धांवोनि आली।
धरुनि हृदयेशी तिजला सेज केली॥
करिति विजणवारे त्या सख्या वेगळाल्या।
वडिलवडिल दाया जाणत्याही मिळाल्या॥

(c) रंगांच्या रसनेत सूर्य बुडला अंधारले सागरी
बेटांचे जळबिंब फक्त हलते माझ्याच प्राणावरी
घोड्यांचे पथ दक्षिणेत मिटले गेले सखेसोबती
एकाकी नभ प्राक्तनात शिरता रक्तात येते भिती.

(d) कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते
उठतिल त्या ज्वालातुन भावी क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळाखळा तुटणार

(e) जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी।
झड घालुन प्राण देतो दीपकाचे वरी।
हे मी सांगत असतांना कांगे पडले भरी।
रत्न टाकून पदरांत गार घेऊ नकोरे॥

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'बालकवी निसर्गाकडे एक पूर्ण रूप, एक आनंदाचे रूप म्हणून पाहतात. त्यांच्या दृष्टीने निसर्गाचे जग हे निर्मत्सर, निरागस आहे.' या विधानाची सत्यता पटवून द्या. 15

(b) '''जाहीरनामा' म्हणजे विसाव्या शतकातील माणसांना उद्देशून कवीने केलेले आवाहन आहे.'' या विधानाची चिकित्सा करा. 15

(c) ''स्वातंत्र्याबद्दलची कमालीची आसक्ती, याबरोबरच अन्याय, जुलूम, विषमता यांच्या विरुद्धचा आक्रोश हा 'विशाखा' या संग्रहाचा मुख्य आशयप्रदेश आहे.'' या विधानाचा परामर्श घ्या. 20

Optional Province · optionalprovince.com

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नामदेवांच्या अंतरंगाचे अत्यंत स्वच्छ व नितळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगवाणीतून कसे प्रकट झाले आहे, ते विचार करा. 15

(b) ''शाहिरी कवितेच्या प्रेरणा स्वतंत्र असल्याने त्यांचा आविष्कारही स्वतंत्र आहे.'' साधार चर्चा करा. 15

(c) ''काव्यगुणांच्या दृष्टीने दमयंतीस्वयंवर हे प्राचीन मराठीतील सर्वश्रेष्ठ मानले पाहिजे.'' विवेचन करा. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''मृदगंध या कविता संग्रहात करंदीकरांची सामाजिक जाणीव आणि इहवादी दृष्टिकोन ठाशीवपणे व्यक्त होतो.'' चर्चा करा. 15

(b) ''भारतीय संस्कृतीतील संचित आणि पाश्चात्य वाङ्मयाचे संस्कार यांमुळे ग्रेस यांची कविता अनोख्या संवेदनविश्वातून फिरत असल्याचे जाणवत राहते.'' या विधानाचा परामर्श घ्या. 15

(c) ''ढसाळांच्या कवितेत समूहनिष्ठेबरोबरच वैयक्तिक भावजीवन व्यक्त करणारा आत्मनिष्ठ सूरही व्यक्त होतो.'' 'या सत्तेत जीव रमत नाही'च्या आधारे स्पष्ट करा. 20

★★★

Optional Province · optionalprovince.com